# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road.Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.६८ दिनांक १३/०७/२०२१**

## जव्हार पोलीस ठाणे येथील खुनाच्या गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा,बोईसर यांना यश

दिनांक १०/०७/२०२१ रोजी १२.०० वा.ते दिनांक ११/०७/२०२१ रोजी १०.३० वाजताचे पुर्वी बाळांतीण डोंगराच्या परीसरात पळशीण पो. पिंपळशेत ता. जव्हार जि. पालघर येथे यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की, त्यांची मयत आई नामे गुलाब शांताराम लाखन वय ४० वर्षे हि त्यांचे शेतावर काम करण्यासाठी गेली होती. ती सायकाळी नेहमीप्रमाणे परत घरी न आल्याने फिर्यादी व त्यांचे गावातील लोकांनी मयत हिचा गावात व आजुबाजुचे परिसरात शोध घेतला असता तीचे प्रेत हे दिनांक ११/०७/२०२१ रोजी १०.३० वाजता बाळांतीण डोंगराच्या परीसरात अंदाजे १५० मीटर अंतरावर डोंगरउतारावार ऊक्षीच्या झाडाचे झुडपाजवळ मयत स्थितीत मिळुन आलेले असुन तीला कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन जिवेठार मारुन टाकलेले आहे म्हणुन जव्हार पोलीस ठाणे गुन्हा र.नं. ६८/२०२१ भादंविसंक ३०२, २०१ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयांचा अधिक तपास पोनि अप्पासाहेब लेंगरे, प्रभारी अधिकारी जव्हार पोलीस ठाणे हे करित आहेत.

मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचे अधिपत्याखाली स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोउनि/आशिष पाटील, व स्टाफ यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करुन आरोपीत वय ३२ वर्षे, रा. पळशीण ता. जव्हार जि. पालघर यास ताब्यात घेवुन कसुन चौकशी केली असता त्याने अनैतीक सबंधातुन खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, पोनि अप्पासाहेब लेंगरे, प्रभारी अधिकारी जव्हार पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोउनि/आशिष पाटील, व स्टाफ सफौ/सुनिल नलावडे, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/सरदार, पोहवा/डोंब, पोना/नरेंद्र पाटील, पोना/कैलास पाटील यांनी केली आहे.

Scanned with CamScanner